# ई - पोलीस पत्रिका

दिनांक ०८/११/२०२४ अनु.क्र. २०४

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महीला, मुले व जेष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.
- " सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**१.पोआअ/आस्था-५/बालसंगोपन रजा/९६२५/२०२४ अमरावती शहर दिनांक ०५/११/२०२४**

## आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधी करीता त्यांचे बाळाचे संगोपनाकरीता विशेष रजा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०१७/प्र.क्रं.२५/सेवा-६, दिनांक २३/७/२०१८ मधील तरतुदीनुसार अटी व शर्तीचे अधिन राहून बालसंगोपन रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्रं. | पदनाम वब.नं. व नांव, व नेमणूक | प्रसुतीचा दिनांक | अपत्यांची संख्या | रजा कोणत्या अपत्या करीता | मागणी केलेली रजा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मपोशि/१८२६, प्रिया गेडाम पो.स्टे.फ्रेजरपुरा | दि.२९/०५/२०२४ | 2 | दुस-या | ६०दिवस प्रसुती रजेला जोडुन |
| 2 | मपोशि/१५६०, प्रिती श्रीराव शवाशा पुर्व | दि.०५/०५/२०२४ | 2 | दुस-या | ६०दिवस प्रसुती रजेला जोडुन |
| 3 | मपोहवा/१३२९, ज्योती अरुळकर पो.स्टे.राजापेठ | दि.०८/०५/२००८ | 2 | दुस-या | ३० दिवस |
| 4 | मपोशि/१५९४,पुनम यादव पोलीस मुख्या. | दि.०४/०७/२०१६ | 1 | पहिल्या | ३० दिवस |

**उपरोक्त अ.क्र.१ व २ वगळुन वरील महिला पोलीस अंमलदार यांना विधानसभा निवडणुक बंदोबस्त व आचार संहिता संपुष्टात आल्यानंतर बालसंगोपन रजेवर सोडण्यात यावे.**

**अटी व शर्ती :-**

१. मुलाचे वय १८ वर्षे होई पर्यंत सदर रजा लागु राहील.

२. एका वर्षा मध्ये कमाल २ महिन्याच्या कमाल मर्यादेत सदर रजा घेता येईल.

३. पहिल्या दोन जेष्टतम हयात मुलांकरीता सदर रजा लागु रहील.

४. उपरोक्त महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेच्या कालावधीसाठी रजेवर जाण्याच्या लगतपुर्वी जेवढे वेतन मिळत असेल तेवढीच रजा वेतन देण्यात येईल.

५. सदर कालावधीत रजा प्रवास सवलत (LTC) अनुज्ञेय ठरनार नाही.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**०१.पोआअ/विचौ-२/अहवाल/वॉकी-टॉकी हरविली/पोना-१४२५ हरणे/९५१८/२०२४ अमरावती शहर दिनांक २९/१०/२०२४**

## आदेश

पोना/१४२५ प्रमोद हरणे, पोलीस स्टेशन सिटी कोतवाली, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन यांची दि.२७/०७/२०२४ चे २०.०० वा.ते दि. २८/०७/२०२४ चे सकाळी ०९.०० वा. पर्यत पो.स्टे. सिटी कोतवाली हद्दीतील बिट मार्शल क्र. ०२ म्हणुन डयुटी नेमण्यात आली होती. सदर टयुटी (पेट्रोंलीग) दरम्यान नमुद पोलीस अंमलदार यांचे कडुन वॉकी - टॉकी PW No. १३३४, Sr.No.७५५०हरविली आहे. सदर वॉकी-टॉकी ची किंमत ११४२८/- आहे. तरी त्यांचे वेतनामधुन प्रतिमहा रु. ५७१४ x २ हप्ते = रु. ११४२८/- वसुली करण्यात यावी.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## वेतन निश्चिती

**१.पोआअ/पशा-१/वार्षीक वेतनवाढ-२०२४/ सपोनि/९५२२/२०२४, अमरावती शहर दिनांक-२९/१०/२०२४**

## आदेश

श्री. हेमंत बाळकृष्ण फड, सहायक पोलीस निरीक्षक, नेमणूक पो.स्टे. फ्रेजरपुरा, अमरावती शहर हे नाशिक शहर येथून पोलीस आयुक्त, अमरावती शहर या घटकात दि.०१.०३.२०२४ रोजी हजर झाले आहे. त्यांचे सेवा पुस्तक उपलब्ध नसल्यामुळे त्यांना ०१.०७.२०२४ ची वेतनवाढ मंजूर करण्यात आली नव्हती. श्री.हेमंत फड, सहायक पोलीस निरीक्षक यांचे सेवा पुस्तक दि. १४.१०.२०२४ रोजी प्राप्त झाले असून त्यांना वार्षिक वेतनवाढ देय ठरत असल्याने दि. ०१.०७.२०२४ ची वेतनवाढ देण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील ३६ व ३९ चेतरतुदीनुसार आणि शासन अधिसुचना वित्त विभाग क्रमांक वेपुर २०१९/प्र.क्र.१ /सेवा ९ दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी

सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ मधील १० चे तरतुदी नुसार वार्षिक वेतन वाढ देयहोत असल्याने खालील नमुद अधिकारी यांना दि. ०१.०७.२०२४ ची खालील प्रमाणे वेतनवाढ मंजूर करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतन स्तर | वेतन स्तर |
|---|---|---|
| सहायक पोलीस निरीक्षक | S-१५ | ४१८००-१३२३०० |

| पोलीस अधिकारी यांचे नाव | मागील वार्षिक वेतनवाढ | | | | देय वार्षिक वेतनवाढ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विवरण | दिनांक | वेतन स्तर | वेतन | विवरण | दिनांक | वेतन स्तर | वेतन |
| श्रीहेमंत बाळकृष्ण फड | सहायक पोलीस निरीक्षक | ०१.०७.२०२३ | S-१५ | ५४६०० | सहायक पोलीस निरीक्षक | ०१.०७.२०२४ | S-१५ | ५६२०० |

प्रमाणित करण्यात येतेकी उपरोक्त अधिकारी यांना दि. ०१.०७.२०२४ ची वार्षिक वेतनवाढ यापूर्वी मंजूर व प्रदान करण्यात आली नाही. तरी त्यांना वरील वार्षिक वेतनवाढी मुळे देय फरकाची रक्कम रोखीने अदा करावी.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,
पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस